मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नळांना विद्युत पंप लावून पाणीउपसा

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून 25 ठिकाणी कारवाई




**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढून पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या आंद्रा धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या परिसरांत पाणी कमी झाल्याने थेट नळाला विद्युत पंप जोडून पाणी उचलण्याचे प्रकार होत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने असे २५ पंप जप्त केले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. शहरातील तापमानाचा पारा चाळिशीपार गेल्यामुळे पाण्याच्या मागणीत वाढ होऊ लागली आहे. त्यातच आंद्रा धरणातून येणारे पाणी कमी झाल्याने समाविष्ट गावांसह उपनगरांमध्ये अपुरा पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होऊ लागली आहे.

> पाण्याची मागणी वाढली आहे. नागरिकांनी वाहन धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरू नये, तसेच अंगणामध्ये, रस्त्यावर पिण्याचे पाणी शिंपडणे टाळावे. जास्त पाणी मिळावे, म्हणून काही नागरिक महापालिकेच्या नळजोडाला थेट विद्युत पंप लावून पाणीउपसा करतात. अशा नागरिकांवर कारवाई सुरू केली आहे. पिंपळे गुरव भागात २५ पंप जप्त केले आहेत. वॉशिंग सेंटरचालकांनी पिण्याचे पाणी वाहन धुण्यासाठी वापरल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.
>
> **- अजय सूर्यवंशी, सहशहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**



वाकड, पिंपळे गुरव, चिखली, मोशी, चऱ्होली, दिघी, भोसरी, डुडुळगाव, थेरगाव, दापोडी, काळेवाडी, किवळे, वाल्हेकरवाडीसह शहराच्या विविध भागांत पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याच्या आणि अपुरा व अवेळी पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. परिणामी, काही रहिवासी दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यावर पाणी नेण्यासाठी महापालिकेच्या नळजोडाला अनधिकृतपणे इलेक्ट्रिक विद्युत पंप लावून मोठ्या प्रमाणात पाणी उपसत आहेत. त्यामुळे परिसरातील इतर नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊन त्यांच्याकडून तक्रारी येऊ लागल्या असल्याचे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

अशा प्रकारे पाणी उचलण्याचा प्रयत्न करण्यासाठी पिंपळे गुरव परिसरात लावण्यात आलेले २५ पंप जप्त करण्याची कारवाई पाणीपुरवठा विभागाने केली. शहरातील इतर भागांतही पाणी ओढणारे पंप जप्त करण्यात येणार आहेत. 'नळजोडाला थेट विद्युत पंप लावू नये. कोणत्याही खासगी प्लंबरद्वारे अनधिकृत नळ जोडून घेऊ नये,' असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# निगडी-दापोडी रस्त्यावर भुयारी मार्ग

## निगडी-दापोडी मार्गावर हलक्या वाहनांसाठी भुयारी मार्ग बांधण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील मिलिटरी डेअरी फार्म येथे रेल्वे मार्गावर उड्डाणपूल बांधण्यात येत आहे. या पुलावरून वाहतूक करणे सुलभ व्हावे, यासाठी निगडी-दापोडी मार्गावर हलक्या वाहनांसाठी भुयारी मार्ग बांधण्यात येणार आहे. या कामासाठी महापालिकेने थेट पद्धतीने सल्लागार नियुक्त करण्यास स्थायी समितीने मान्यता दिली आहे.



### मेट्रो मार्गाखालचा पहिलाच भुयारी मार्ग

» मेट्रोच्या मार्गाखालून जाणारा हा शहरातील पहिलाच भुयारी मार्ग असेल. भुयारी मार्ग बांधण्यास महामेट्रोने ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. भुयारी मार्गामुळे पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक किंवा नाशिक फाटा चौकाकडून वळसा मारून ये-जा करण्याची आवश्यकता भासणार नाही.

महापालिकेच्या वतीने डेअरी फार्म येथे उड्डाणपूल बांधण्यात येत आहे. या पुलाचे काम जून महिन्यापर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे या पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होणार आहे. वाहनांना लांब अंतरापर्यंतचा वळसा मारून ये-जा करावी लागू नये यासाठी पूल जेथून सुरू होतो, त्या ठिकाणी निगडी-दापोडी मार्गावर भुयारी मार्ग तयार केला जाणार आहे. हा भुयारी मार्ग हलक्या वाहनांसाठी असणार आहे.

# कात्रज-कोंढवा रस्त्याच्या भूसंपादनात अडथळे

## सहा वर्षांत केवळ 43 हजार 456 चौरस मीटर जागेचे भूसंपादन करण्यात महापालिकेला यश

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. गेल्या सहा वर्षांमध्ये केवळ ४३ हजार ४५६ चौरस मीटर जागेचे भूसंपादन करण्यात महापालिकेला यश आले आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम नक्की कधी पूर्ण होऊन वाहनचालकांना दिलासा मिळणार हे अद्यापही निश्चित झालेले नाही.



शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविण्यासाठी सहा वर्षांपूर्वी महापालिकेने कात्रज ते कोंढवा या रस्त्याचे काम हाती घेतले आहे. मात्र, रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेला प्रयत्न करावे लागत आहेत. रस्त्याच्या भूसंपादनासाठी सुमारे ७१० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. पूर्वी ८४ मीटर रुंदीकरण करण्यात येणारा हा रस्ता आता ५० मीटर करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

रस्त्याची रुंदी कमी केल्याने या भूसंपादनाचा खर्च २८० कोटी रुपये इतका येणार होता. यापैकी राज्य सरकारकडून १४० कोटी रुपयांचा निधी महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. या निधीतून रस्त्यासाठी जागा दिलेल्या जागामालकांना भरपाई देणे महापालिकेने सुरू केले आहे. तसेच, या भागांत ग्रेड सेपरेटरचे कामदेखील सुरू करण्यात आले आहे. ज्या जागा महापालिकेच्या ताब्यात आल्या तेथे रस्ता बांधला जात असल्याचे मालमत्ता विभागाचे प्रमुख महेश पाटील यांनी सांगितले.

> कात्रज-कोंढवा रस्त्याच्या ५० मीटर रुंदीसाठी ९४ हजार चौरस मीटर जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्यापैकी ४३ हजार ४५६ चौरस मीटर जागा महापालिकेच्या ताब्यात आली आहे. उर्वरित जागा ताब्यात घेण्यासाठी संबंधित मालकांशी चर्चा सुरू आहे.
> **- महेश पाटील, मालमत्ता विभाग प्रमुख, पुणे महापालिका.**

# पुरंदर विमानतळासाठी सहा महिन्यांत भूसंपादन

## येत्या सहा महिन्यांत संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करणार : जिल्हाधिकारी डुडी यांना विश्वास

**पुणे | प्रतिनिधी**

'पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनासाठी बाधित शेतकऱ्यांबरोबर संवाद साधण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. येत्या सहा महिन्यांत संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे,' असा विश्वास जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी बुधवारी व्यक्त केला. 'बाधित सात गावांतील शेतकऱ्यांनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडता, परस्पर जमिनींची विक्री करू नये. नक्कीच त्यांना योग्य मोबदला मिळेल,' असे आश्वासनही त्यांनी दिले.



पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वार्तालाप कार्यक्रमात डुडी बोलत होते. पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे या वेळी उपस्थित होते. पुरंदर विमानतळ जुन्याच जागी होणार असल्याचे स्पष्ट करून भूसंपादनाबाबत कार्यवाही सुरू करण्यासाठी संवाद साधण्यासाठी सुरुवात केली असल्याचे त्यांनी सांगितले.

डुडी म्हणाले, 'पुरंदर विमानतळासाठी दोन हजार ८०० हेक्टर भूसंपादन करावे लागणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) २०१३ च्या कायद्यानुसारच शेतकऱ्यांना मोबदला देण्यात येणार आहे. त्यासाठी स्वेच्छेने सहमती दर्शविणाऱ्या शेतकऱ्यांना पाचपटींनी मोबदला देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. जमिनीची मोजणी, बागायती, जिरायती क्षेत्र, नैसर्गिक स्रोत, विहीर, झाडे, फळझाडे आदींनुसार मोबदला मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संवाद नसल्याने चुकीच्या भूलथापांना बळी पडल्याचे दिसून आले आहे. मात्र, अनेक शेतकरी स्वतःहून किती मोबदला मिळणार आदी चौकशी करून सहमती दर्शविण्यासाठी तयार असल्याचेही अधोरेखित झाले आहे.'

'आतापर्यंत चार गावांत बैठका घेऊन स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. तर येत्या आठवडाभरात उर्वरित तीन गावांतील शेतकऱ्यांबरोबर बैठका घेऊन संवादाची प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर फेरसर्वेक्षण आणि मोजणी प्रक्रिया पूर्ण करून येत्या सहा महिन्यांत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल,' अशी ग्वाही डुडी यांनी दिली.

### वर्तुळाकार रस्त्यासाठी तीन महिन्यांत भूसंपादन

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून साकारण्यात येणाऱ्या वर्तुळाकार रस्त्याच्या भूसंपादनाला वेग आला आहे. येत्या तीन महिन्यांत ९० टक्क्यांहून अधिक भूसंपादन पूर्ण करून देण्याबाबतचा विश्वासही जिल्हाधिकारी डुडी यांनी व्यक्त केला.

### 'शेतीतून उन्नती प्रकल्प'

» कृषी क्षेत्राबाबत पुढील पाच वर्षांसाठी कृषी विकास आराखडा तयार करण्यात येत असून, 'शेतीतून उन्नती' हे प्रकल्प अभियान राबविले जाणार आहे. देशभरातून मागणी असलेले पुरंदरमधील अंजीर, महाबळेश्वर आणि आंबेगावमधील स्ट्रॉबेरी, इंदापूरमधील सूर्यफूल, जुन्नरमधील आंबा ही पाच पिके निवडून विशेष निर्यात धोरणसंबंधी आराखडा तयार करण्यात येत आहे. त्यासाठी येत्या जूनमध्ये 'कृषी हॅकेथॉन' तसेच पर्यटन क्षेत्रातील विकासासाठी 'टुरिझम हॅकेथॉन', औद्योगिक क्षेत्रासाठी 'टूल हब सेंटर', ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सुलभ शिक्षण व्यवस्थेसाठी शाळा असे नियोजन करण्यात आले आहे.

# आरोग्य सेवेसाठी पिंपरी महापालिकेला दोन पारितोषिके

## आरोग्य वैद्यकीय अधिकारी या श्रेणीत दुसऱ्या क्रमांकाचा 'महाराष्ट्र आरोग्य सन्मान 2025' हा पुरस्कार महापालिकेला मिळाला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाचा दोन पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र या श्रेणीत आकुर्डीतील कै. ह. भ. प. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालयाला पहिल्या क्रमांकाचा, तर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या श्रेणीत दुसऱ्या क्रमांकाचा 'महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५' हा पुरस्कार महापालिकेला मिळाला आहे. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे झालेल्या "महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५" या राज्यस्तरीय कार्यक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचा दोन पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला.



'महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५' या राज्यस्तरीय कार्यक्रमात विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक आरोग्य विभाग व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी पुरस्कार स्वीकारला. वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, डॉ. राजेंद्र फिरके, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुपेकर या वेळी उपस्थित होते.

'राज्यातील सर्वाधिक प्रसूती करणारे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र' या श्रेणीत कै. ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय, आकुर्डी या रुग्णालयाला पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला. तसेच, आरोग्य वैद्यकीय अधिकारी या श्रेणीत दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार महापालिकेला मिळाला आहे. या पुरस्कारासाठी वर्षभरात रुग्णालयांद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम याचे मूल्यमापन करून क्रमवारी निश्चित करण्यात आली होती.

वैद्यकीय सेवा बळकट करण्यासाठी आम्ही अधिकाधिक प्रयत्न करत आहोत. महापालिकेला मिळालेला पुरस्कार आरोग्य विभागाने केलेल्या कामाला प्रोत्साहन देणारा आहे. यापुढेही नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, या दृष्टीने नियोजन केले जात असल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला राज्यस्तरावर दोन पुरस्कार मिळाले असून हा सन्मान पिंपरी चिंचवड शहरातील सर्व नागरिकांचा आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून सातत्याने करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कामाचा हा सन्मान आहे. आगामी काळातही पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना उत्तमोत्तम आरोग्य सेवा देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील राहील.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> 'महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५' मध्ये मिळालेले पुरस्कार म्हणजे महानगरपालिकेच्या वैद्यकीय यंत्रणेत कार्यरत असलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याचे आणि कर्मचाऱ्यांचे यश आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डेटा-आधारित कामकाज आणि नागरिकाभिमुख दृष्टिकोन यामुळे आरोग्य सेवा अधिक प्रभावी व लोकाभिमुख करण्यास महानगरपालिका प्रयत्नशील असून राज्यस्तरावर मिळालेले पुरस्कार या कामासाठी प्रेरणादायी ठरणारे आहेत.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेची वैद्यकीय आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी आम्ही अधिकाधिक प्रयत्न करत आहोत. महानगरपालिकेला मिळालेला पुरस्कार आमच्या आरोग्य विभागाने केलेल्या कामाला प्रोत्साहन देणारा आहे. यापुढेही नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, याहष्टिने आम्ही नियोजन करीत आहोत.
>
> **-डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

# पुणे-पीसीएमसी मेट्रो' नामविस्ताराची मागणी; आमदार शंकर जगताप यांनी सुचवले दोन नवे मेट्रो मार्ग

## महापालिकेच्या वतीने ऑटो क्लस्टर, चिंचवड येथे विशेष चर्चासत्र घेण्यात आले, या बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी महत्त्वाच्या सूचना केल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड, पुणे व पीएमआरडीए हद्दीसाठी एकात्मिक दळणवळण विकास आराखडा महामेट्रोमार्फत अंतिम टप्प्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने ऑटो क्लस्टर, चिंचवड येथे विशेष चर्चासत्र घेण्यात आले. या बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यकालीन गरजांचा विचार करून आराखड्यात महत्त्वाच्या सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. विशेषतः 'पुणे मेट्रो'चा 'पुणे-पीसीएमसी मेट्रो' असा नामविस्तार करण्याची त्यांनी आग्रही मागणी केली.



शहरात केवळ एकच मेट्रो मार्ग असतानाही पिंपरी-चिंचवड व पुणे शहरासाठी समान मुद्रांक शुल्क आकारले जात आहे, हे अन्यायकारक असून यावर त्वरित पुनर्विचार करावा, अशी मागणीही आमदार जगताप यांनी केली.

पिंपरी-चिंचवडसाठी मेट्रोचे नवे मार्ग प्रस्तावित करताना त्यांनी भक्ती-शक्ती ते वाकड मार्गे चाकण आणि वाकड ते कात्रज हे दोन नवीन मेट्रो मार्ग सुचवले. वाढती लोकसंख्या व उद्योग वसाहती लक्षात घेता हे मार्ग भविष्यात उपयुक्त ठरतील, असे त्यांनी नमूद केले.

या चर्चासत्रात पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, माजी नगरसेवक संदीप वाघेरे, राजेंद्र गावडे, नामदेव ढाके, राजू दुर्गे, मारुती भापकर, सचिन चिखले, शर्मिला बाबर, शेखर चिंचवडे, धनंजय भिसे आदी उपस्थित होते.

### जलवाहतुकीचा पर्याय आणि इतर महत्त्वाच्या मागण्या

- » पवना व इंद्रायणीमधून जलवाहतूक पर्याय तपासून घेऊन तो आराखड्यात अंतर्भूत करावा.
- » मेट्रो स्थानकांबाहेर निशुल्क पार्किंगची व्यवस्था असावी. तेथील वाहनांवर कोणतीही दंडात्मक कारवाई नको.
- » उद्योगनगरीतील मेट्रो पोल व थांब्यांवर वारकरी संप्रदायाशी संबंधित चित्ररचना करण्यात याव्यात.
- » हिंजवडी-वाकड भागासाठी स्वतंत्र एसटी स्थानकाची उभारणी व्हावी.
- » स्मार्ट सिटीअंतर्गत उंचवलेले फुटपाथ रस्ते अरुंद करत असल्याने वाहन गॅरेज व वाहतूक प्रवाह यावर परिणाम न होईल अशा उपाययोजना कराव्यात.
- » वाल्हेकरवाडी येथे रेल्वे ओव्हर ब्रिज व एमएम चौक काळेवाडी येथे ग्रेड सेपरेटर त्वरीत उभारण्यात यावा.

# साकळाई योजनेला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

## चिंचणी येथील बैठकीत शेतकऱ्यांनी आक्रमक होत 'आमच्या हक्काचं पाणी साकळाई योजनेला मिळू देणार नाही' असा सुर लावला.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील घोड धरण मुळ लाभार्थी बचाव समिती तसेच शिरुर व श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांनी साकळाई योजनेला तीव्र विरोध दर्शवत गुरवार (दि १०) रोजी चिंचणी येथे बैठक घेतली. चिंचणी येथील बैठकीत शेतकऱ्यांनी आक्रमक होत 'आमच्या हक्काचं पाणी साकळाई योजनेला मिळू देणार नाही' असा सुर लावला.

चिंचणी येथे आज (दि १०) रोजी ११ वाजता घोड धरणाच्या पाण्यावर अवलंलुन असणाऱ्या शिरुर तसेच श्रीगोंदा तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत साकळाई योजना हि श्रीगोंदा तालुक्यातील विसापुर येथुन करण्यात यावी. कारण ते सोयीस्कर आहे. तर घोड धरणाची अवस्था हि 'आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार' अशी असल्यामुळे सरकारने साकळाई योजना रद्द करावी अन्यथा पाण्यासाठी जीव गेला तरीही आमच्या हक्काचं घोडचं पाणी आम्ही कोणाला देणार नाही असा ठाम निर्धार या बैठकीत शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

सध्या कारेगाव, ढोकसांगवी, निमोणे तसेच अनेक गावासाठी पिण्याच्या पाण्याच्या योजना गेलेल्या असुन त्यांचं काम अंतिम टप्प्यात आहे. धरणाच्या खालच्या बाजुस शिरसगांव काटा, धनगरवाडी , इनामगांव , नलगेमळा , गांधले मळा , तांदळी खोरे , तांदळी संगम येथे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे असुन घोड धरणाच्या पाण्यामुळे या बंधाऱ्याना मोठया प्रमाणात फायदा होतो.

यावेळी बाळासाहेब घाडगे, नरेंद्र माने, एकनाथ वाळुंज, श्रीनिवास घाडगे, राकेश पाचपुते, विठ्ठलराव काकडे, शामराव पवार, दादासो पवार, अनिल माणिक पवार, सुनील गायकवाड, शहाजी गायकवाड, संजय काळे, योगेश ओव्हाळ, संदीप नवले, संतोष काळे, माऊली नागवडे, सुमन वाळुंज, अनिल सुभेदार पवार, राम जेऊघाले, नामदेव पवार, बाळासाहेब पवार, अशोक पवार, संतोष लगड तसेच घोडधरणाचे अनेक लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.





### तुमच्या राजकारणापाई शेतकऱ्यांचं वाटोळं करु नका

» राधाकृष्ण विखे पाटील हे पहिल्या सरकारमध्ये महसुलमंत्री असताना त्यावेळी त्यांनी गोरगरीब लोकांना कमी दरात वाळू मिळावी यासाठी घोड धरणातील वाळूचा शासकीय लिलाव केला. चिंचणी आणि निमोणे या ठिकाणी वाळू डेपो उभारले. परंतु गोरगरीब लोकांना शासकीय दरात वाळू मिळण्याऐवजी वाळू ठेकेदार आणि राजकीय नेत्यांचे बगलबच्चे मात्र गब्बर झाले. तसंच राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राजकीय भवितव्यासाठी त्यांनीच साकळाई योजनेचा घाट घातला असुन आधीच धरण क्षेत्रातील लाभार्थी शेतकऱ्यांना उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासते. त्यात साकळाई योजना झाल्यास घोड धरणात किती पाणी शिल्लक राहणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला असुन 'तुमच्या राजकारणापाई आमचं वाटोळं करु नका' असाच सुर आजच्या बैठकीत शेतकऱ्यांनी काढला.

### घोड धरणाची भौगोलिक परिस्थिती

» चिंचणी(ता.शिरुर) येथील घोड धरणाची एकुण पाणी साठवण क्षमता ७६३८ दशलक्ष घनफुट असुन उपयुक्त पाणीसाठा ५४६७ दशलक्ष घनफुट आणि मृत पाणीसाठा २१७२ दशलक्ष घनफुट आहे. धरणाला दोन कालवे असुन उजव्या कालव्याची लांबी ३० किमी आणि डाव्या कालव्याची लांबी ८४ किमी आहे. शिरुर तालुक्यासह अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा आणि कर्जत या तालुक्यातील मिळून तब्बल २० हजार ५०० हेक्टर क्षेत्र या धरणामुळे सिंचनाखाली आले असुन शेतीसाठी १४५. ८ दलघमी इतक्या पाण्याचा वापर केला जातो.

### धरणातून पिण्याच्या पाण्याच्या अनेक योजना

» घोड धरणातून रांजणगाव औद्योगिक वसाहत, घोडगंगा सहकारी साखर कारखाना, श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना, तसेच शिरुर, काष्टी व श्रीगोंदा येथे पाणी पुरवठा करण्यासाठी जलवाहिनीद्वारे पाणी नेलेले आहे. तसेच सध्या कारेगाव, ढोकसांगवी, निमोणे तसेच अनेक गावासाठी पिण्याच्या पाण्याच्या योजना गेलेल्या असुन त्यांचं काम अंतिम टप्प्यात आहे. धरणाच्या खालच्या बाजुस शिरसगांव काटा, धनगरवाडी , इनामगांव , नलगेमळा , गांधले मळा , तांदळी खोरे , तांदळी संगम येथे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे असुन घोड धरणाच्या पाण्यामुळे या बंधाऱ्याना मोठया प्रमाणात फायदा होतो.

# माजी सभापती प्रवीण माने भाजपच्या वाटेवर?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी प्रवीण मानेंबरोबर झाली चर्चा

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर विधानसभेच्या निवडणुकीत अपक्ष म्हणून पहिल्यांदाच उभे राहून आपली तालुक्यात अनोखी राजकीय क्रेज निर्माण करणारे पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य सभापती प्रवीण माने यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेत आगामी राजकीय खलबते केलेली आहेत. प्रवीण माने यांच्या रूपाने इंदापूर तालुक्यात भाजपला ताकदवान, युवक नेता मिळण्याची चित्रे स्पष्ट झाले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसातच, भारतीय जनता पार्टीत प्रवीण माने व त्यांचे समर्थक पक्षप्रवेश करणार, अशी चर्चा इंदापूर तालुक्यात रंगलेली आहे.



गुरुवारी (दि. 10) जिल्हा परिषदेचे बांधकाम व आरोग्य माजी सभापती प्रवीण माने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याचे, आपल्या सोशल मीडियावर फोटो टाकले आहेत. त्यामुळे इंदापूर तालुक्यामध्ये असणारे प्रवीण माने यांचे समर्थक यांनी भाजप पक्षप्रवेशा आधीच माने यांना शुभेच्छा सुरू केले आहेत. तसे पाहिले तर प्रवीण माने यांचे तालुका भर नेटवर्क मोठे असल्याने व त्यांच्या पाठीशी सोनाई परिवार खंबीर असल्याने तालुक्यात येणारी प्रत्येक निवडणूक ते पक्ष वाढीसाठी ताकतीने कार्यकर्त्यांच्या जीवावर लढू शकतात.

आगामी पुणे जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती व इतर निवडणुकांत भारतीय जनता पार्टीला इंदापूर तालुक्यामध्ये प्रवीण माने यांच्या रूपाने मोठी राजकीय ताकद मिळणार आहे. पुढील विधानसभा निवडणूक झाल्यापासून प्रवीण माने हे भाजपमध्ये जातील, अशी अटकळ तालुक्यामध्ये बांधली जात आहे; मात्र माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे असणारे भाजपचे स्नेहसंबंध यामुळे प्रवीण माने यांना भाजपमध्ये जाण्यासाठी ब्रेक लागत होता; मात्र भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी हर्षवर्धन पाटील यांच्या बाबतीत स्पष्ट मत जाहीर केल्याने, प्रवीण माने यांना भाजप प्रवेश करण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे.

### माने गटाकडून अधिकृत प्रतिक्रिया नाही

» प्रवीण माने यांनी भारतीय जनता पार्टी प्रवेश केला तर इंदापूर तालुक्यात पहिल्यांदाच या पक्षाला येणाऱ्या निवडणुकीमध्ये दमदार यश मिळेल असे बोलले जात आहेत. मध्यंतरी उपमुख्यमंत्री अजित पवार व राज्याचे इतर खात्याचे मंत्री यांची भेट देखील प्रवीण माने यांनी घेतली होती. त्यामुळे इंदापूरच्या राजकारणात वेगळीच भर पडेल की काय? असे वाटत होते; मात्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निवासस्थान प्रवीण माने यांनी गाठल्यामुळे, बाकीच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. असे असले तरी देखील प्रवीण माने यांच्या गटाकडून अधिकृत या संदर्भात काही माहिती समोर आली नाही.